पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/२८२/२०१०
दिनांक- १८/२/२०१०

प्रति,
मा. .....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २३.२.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार,दिनांक २३.२.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १५५

दिनांक- २३.२.२०१० वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २३.२.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक- १) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दि.१०/२/२०१०, ठ.क्र.२३ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मुलींना यो.क्र.- १० खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे २०० लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.२,००,०००/- अदा करणेस तसेच सदर योजनेतील व इतर सर्व योजनांमधील अपात्र असलेल्या व तद्नंतर कागदपत्रांची पुर्तता करणा-या सर्व पात्र लाभार्थींना संबंधित योजनेनुसार अर्थसहाय्य अदा करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दि.१०/२/२०१०, ठ.क्र.२६ नुसार,चदि.८ मार्च जागतिक महिला दिनछ मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत आयोजित करणे आवश्यक असल्याने यासाठी मनपाच्या चार प्रभागामध्ये विविध सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणेस व त्याकामी येणारे र.रु.१०,००,०००/- खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१८.१.२०१० ते दि.२४.१.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/११/२०१० दि.११.२.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ४) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२५.१.२०१० ते दि.३१.१.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१२/२०१० दि.११.२.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ५) मुंबई पुणे महामार्गावर जाहीरात हक्क देणेच्या कामांतर्गत कामासाठी जाहीरात प्रसिद्ध केलेल्या दै.टाईम्स् ऑफ इंडिया (पुणे व मुंबई आवृत्ती) र.रु.३,५८,५६०, दै.पुढारी (पुणे) र.रु.२१६०/-, दै.इंडियन एक्सप्रेस (मुंबई आवृत्ती) व दै.लोकसत्ता (मुंबई आवृत्ती) एकत्रीत र.रु.१,९५,२००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, तालेरा व जिजामाता हॉस्पिटल येथील जनरेटरची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ओम एकदंताय इलेक्ट्रीकल (नि.र.रू.१,३९,९७७/- [र.रू.एक लाख एकोणचाळीस हजार नऊशे सत्त्याहत्तर] पेक्षा १५% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ७) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२००९-१० मधील अ.क्र.५ अन्वये, रावेत व किवळे जकात नाका येथील डिझेल जनरेटर सेट आणि U.P.S.ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ओम एकदंताय इलेक्ट्रीकल (नि.र.रू.४,६६,०९२/- [र.रू.चार लाख सहासष्ट हजार ब्याण्णव] पेक्षा १८% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स् ॲन्ड सायन्सच्या विद्यार्थ्यांना Clinical Psychology प्रशिक्षणासाठी माहे ०८/०२/२०१० ते २०/०३/२०१० या कालावधीसाठी पूर्वलक्षीप्रभावाने एकुण ५ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणास अनुमती देण्यास व त्यासाठी होणारी फी र.रु.२१००/- आकारण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये लोकमान्य मेडिकल फाऊंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांना Health Nursing Experience साठी माहे १५/०२/२०१० ते १४/०३/२०१० या कालावधीसाठी एकुण ७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणास अनुमती देण्यास व त्यासाठी होणारी फी र.रु.२९४०/- आकारण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) डॉ.प्रविण रामदास गांजरे - एम.एस.,एफ.सी.पी.एस., एम.सी.एच. (Magister Chirurgie) यांना तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या दिनांकापासून सहा महिने कालावधीकरता दरमहा एकत्रित र.रु.२५,०००/- मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) मनपाची दैनंदिनी छपाई करुन घेणेकामी लघुत्तम निविदाकार मे.आशिष एंटरप्रायजेस यांना एक्झीक्युटीव्ह दैनंदिनी ७००० नग एकूण र.रु.४,०८,७३०/- (र.रू.चार लाख आठ हजार सातशे तीस) व मे.पंकज प्रिंट प्रॉडक्टस यांना पॉकेट डायरी ६५०० नग एकूण र.रु.९२,६२५/- (र.रू.ब्याण्णव हजार सहाशे पंचवीस) याप्रमाणे दर स्वीकृत करुन करारनामा करुन पुरवठा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १२) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.०७ अन्वये, आकुर्डी दवाखान्याशेजारील १२.०० मी. रस्त्याच्या कडेला रिटेनिंग वॉल बांधणे व नाल्याची उंची वाढवणेकामी मे.ए.डी.देवकर (नि.र.रू.२३,३२,२८०/- [र.रू.तेवीस लाख बत्तीस हजार दोनशे ऐंशी] पेक्षा ३५.३५% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१५,०७,८१९/- [र.रू.पंधरा लाख सात हजार आठशे एकोणीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.११/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, पिंपरी चिंचवड मनपाच्या गवळीमाथा पंपींग स्टेशनकरिता एक्सप्रेस फिडरद्वारे दुहेरी विजपुरवठा करणेकामी भोसरी RSमध्ये पारेषण कंपनीशी संबंधित अनुषंगिक कामे करणेकामी मे.एस.टी. इलेक्ट्रीकल्स् प्रा.लि. (नि.र.रू.८,८४,९२५/- [र.रू.आठ लाख चौऱ्याऐंशी हजार नऊशे पंचवीस] पेक्षा २% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १४) संगणक प्रशिक्षक म्हणून प्रस्तावात नमुद उमेदवारांना मनापाचे १८ माध्यमिक विद्यालयामध्ये सहा महिने कालावधीसाठी प्रत्येकी र.रू.५,०००/- [र.रू.पाच हजार] एकत्रित मानधनावर आदेशाचे दिनांकापासून नेमणूक देणेस व मानधनापोटी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १५) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.१०९ अन्वये, मनपा भवन अंतर्गत वाहतुकीस अडथळा तसेच रस्ता रूंदीकरणात येणारे फिडर पिलर पोल शिफ्ट करणे व दुरुस्त करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४,६६,८२४/- [र.रू.चार लाख सहासष्ट हजार आठशे चोविस] पेक्षा २१ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १६) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.९९ अन्वये, प्रभाग क्र.६७ मधील लक्ष्मीनगर अंतर्गत रस्त्यावर सोडियम व्हेपर पोल व फिटिंगचे नुतनीकरण करणे कामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.३,००,०००/- [र.रू.तीन लाख] पेक्षा ३६.६० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १७) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.९८ अन्वये, ब प्रभागांतर्गत चिंचवड येथील सोडियम व्हेपर पोल व फिटिंगचे नुतनीकरण करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४,२०,०८८/- [र.रू.चार लाख वीस हजार अठ्ठ्याऐंशी] पेक्षा ३६.६० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १८) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.९५ अन्वये, चिंचवड विभागातील अपघातग्रस्त पोलची दुरुस्ती करणे व इतर विद्युत विषयक कामे करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४,४९,९९०/- [र.रू.चार लाख एकोणपन्नास हजार नऊशे नव्वद] पेक्षा ३६.६० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १९) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.११० अन्वये, मनपा भवन अंतर्गत मनपाच्या विविध इमारतींमध्ये वायरिंग दुरुस्त करणेकामी मे.निशांत इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू.४,६६,६८२/- [र.रू.चार लाख सहासष्ट हजार सहाशे ब्याऐंशी] पेक्षा २१ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २०) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील जानेवारी २०१० मधिल सुधारित एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २१) वॉर्ड क्र.३६ आनंदनगर येथे मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन यांचेकडून संडास ब्लॉक बांधणेचे काम निविदा न मागविता व करारनामा करून तसेच या कामासाठी बँक गॅरंटी न घेता कामाचे आदेशासोबत निविदा रक्कम + १७.५० % कार्यवाहीभार शुल्क रक्कमेच्या ५० % आगावू व ५०% काम पुर्ण झाल्यावर ४० % रक्कम आगावू व उर्वरीत १०% रक्कम काम १०० % पुर्ण झाल्यावर अदा करणेचे अटीवर करून घेणेस व त्यासाठी येणारे र.रू.३२,८२,२१५/- [र.रू.बत्तीस लाख ब्याऐंशी हजार दोनशे पंधरा]) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/२८२/२०१०
दिनांक : १८/२/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.